**L. A. BILL No. CIII OF 2025.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३.**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**
**(विधानपरिषदेने दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५८ चा ६०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील, अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ३२क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) कलम ३२क मधील, " कलम ३२-ब" या मजकुराऐवजी, "कलमे ३२ब आणि ५३ब" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५८ चा ६०.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५३ मध्ये, पोट-कलम (१अ ) मधील, "आणि अशा प्रकारे देण्यात आलेला आदेश अंतिम असेल" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५३अ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५३अ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "लेख हजर करण्यास फर्मावू शकेल" या मजकुराऐवजी, "कलम ५३ब अन्वये ज्याच्या बाबतीत राज्य शासनासमोर अपील दाखल केलेले असेल त्या लेखांव्यतिरिक्त त्याच्यासमोर इतर लेख हजर करण्यास फर्मावू शकेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० मध्ये नवीन कलम ५३ब समाविष्ट करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५३अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

राज्य शासनाकडे अपील.

"**५३ब.** कलम ५३ च्या पोट-कलम (१अ) अन्वये दाखल केलेल्या अपिलात मुख्य नियंत्रण महसूल प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, एक हजार रुपये शुल्कासह लेखी अर्जाद्वारे, अशा आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील दाखल करू शकेल, आणि राज्य शासन, पक्षकारांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, प्रकरणाचा विचार करील आणि त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश त्यावर देईल आणि अशा प्रकारे पारित केलेला आदेश अंतिम असेल.".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३.]**

**[ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.**]**

**[ विधानसभेने दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव ( ३ ),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.